**नि. फौ. खटला क्र.४७/२०२०**
**निशाणी क्र. (६४)**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०२ चा पुरावा ::**
**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

**माझे नांव** : चंद्रप्पा संगप्पा कुंभार,

**वय** : ६६ वर्षे, **धंदा** : मजुरी,

**राहणार** : लासोना, ता. देवणी, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी साहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

घटना पाच वर्षापूर्वी कोरोना काळामध्ये १३ तारखेला उन्हाळ्यामध्ये सकाळी ११.०० वाजता माझ्या घरापुढे घडली होती. आरोपीच्या घरातील सांडपाणी माझ्या वाड्यात सोडले होते. त्यामुळे आरोपी दत्तू, नागनाथ व ईतर यांनी शिवीगाळ केली होती. माझी पत्नी समोर गेली असता आरोपी नागनाथने तिला धोंड्याने मारले. ईतर आरोपींनी मला आणि माझा मुलगा वैजनाथ याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर आरोपी निघून गेले. आम्ही पोलीस ठाण्यामध्ये गेलो. सर्व आरोपी सदर पोलीस ठाण्यामध्ये आले होते. पोलिसांनी आमच्याकडे चौकशी केली आणि आम्हाला दवाखान्यामध्ये पाठविले होते. पोलिसांनी मी सांगितल्याप्रमाणे माझा जबाब अचूक व बरोबर लिहिला होता. आरोपी न्यायालयामध्ये हजर नाहीत. मी त्यांना ओळखतो. (अर्ज निशाणी ६० वरील आदेशाप्रमाणे त्यांची हजेरी माफ केलेली आहे.)

सरतपास पूर्ण.

**:: आरोपी करिता विधीज्ञ श्री. एम.बी. बिरादार यांनी अर्ज निशाणी ६१ प्रमाणे उलटतपास तहकूब केला. ::**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत | सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले. |
| ( श.अ. सुरजुसे ) | ( श.अ. सुरजुसे ) |
| न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**. | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**. |

दि. ०८/०८/२०२५.